# पोलीस अधिक्षक औरंगाबाद ग्रामीण

| पोलीस अधिक्षक,कार्यालय | **प्रेस नोट** | दिनांक १६.०२.२०१७ ०१.०० |
|---|---|---|

**प्रति,**

**मा.संपादक**

**दैनिक ..........**

**विषय :—औरंगाबाद ग्रामीण जिल्हयात दाखल /उघडकीस गुन्हयांबाबत.**

यात्वारे आपणास सुचिम करण्यात येते की, औरंगाबाद ग्रामीण जिल्हयात दिनांक १५.०२.२०१७ रोजी खालील प्रमाणे गुन्हे दाखल /उघडकीस आले आहेत.

**०१) पोस्टे गंगापुरः—** गुरन I ५८/१७ कलम ३०२ २०१ भादवि नमुद गुन्हयाचे फिर्यादी नामे सर तर्फे पंडीत बाबासाहेब सोनवणे वय ३२ वर्ष व्यवसाय नौकरी सपोनि पोस्टे गंगापुर यांनी सरकार तर्फे फिर्याद दिली की दिनांक १३.०२.२०१७ रोजी ०९.३०वा. दरम्यान यातील मयत नामे मनदिपसिंग नारायणसिंग बेडवाल वय ३५ वर्ष रा. कोबापुर ता. गंगापुर हा अमली पदार्थाचे नशापाणी करण्याचे व कारण नसताना वाद घालण्याचे सवईचा होता तो मनोरूग्णाचे आजारा खाली वावरत होता अशाच काहीतरी प्रकारातुन वाद होवुन अज्ञात कारणावरून अज्ञात आरोपीने मयताचे डोक्यात पाठीमागुन काहीतरी प्राण घातक हत्याराने मारून त्याचा खुन करून त्याची ओळख पटु नये म्हणुन त्याचे कमरेपासुन वरील भाग जाळुन पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला म्हणुन गुन्हा दाखल करण्यात आला असुन अधिक तपास श्री. आघाव पोनि पोस्टे गंगापुर हे करीत आहे.

**आकस्मात मृत्युः—**

**०१) पोस्टे कन्नडशहरः—** आ.मृ. नंबर ०६/१७ कलम १७४ सिआरपीसी मधिल खबर देणार शिवनाथ लक्ष्मण चव्हाण वय ३३ वर्ष व्यवसाय शेती रा. अंधानेर ता. कन्नड यांनी खबर दिली

की यातील मयत नामे राजु उर्फ मोजराज सुर्यभान जाधव वय ३४ वर्ष रा. अंधानेर ता. कन्नड याने आज दिनांक १५.०२.२०१७ रोजी १७.३०वा. दरम्यान राहते घरी अंधानेर येथे गळफास घेवुन आत्महत्या केली वगैरे खबरी वरून आ.मृ. दाखल करण्यात आला असुन अधिक तपास पोना/११०६ बोंदरे पोस्टे कन्नडशहर हे करीत आहे.

**०२) पोस्टे खुलताबाद :—** आ.मृ. नंबर ११/१७ कलम १७४ सिआरपीसी मधिल खबर देणार पोह/२७३ एम.ए. तडवी नेमणुक घाटी दवाखाना औरंगाबाद यांनी खबर दिली की यातील मयत नामे मनोहर विठ्ठल जाधव वय ४३ वर्ष रा. पळसगाव ता. खुलताबाद यास दिनांक १५.०२. २०१७ रोजी १५.००वा. राहते घरी अचानक छातीत चमक निघुन घबराट होवुन बेशुध्द झाल्याने त्यास उपचार कामी घाटी दवाखाना औरंगाबाद येथे दाखल केले असता तो दिनांक १५.०२.२०१७ रोजी १७.२० वा. मरण पावला आहे अशी एमएलसी खबर दिल्याने आ.मृ. दाखल करण्यात आला असुन अधिक तपास पोना/७९६ कांबळे पोस्टे खुलताबाद हे करीत आहे.

**दारू बंदी कार्यवाही :—**

औरंगाबाद ग्रामीण जिल्हयात विविध पोस्टे ला ०३ गुन्हे मुंबई दारूबंदी कायदया प्रमाणे ०३ ईसमा विरूध्द दाखल झाले असुन त्यांचे कडुन ३५१०/—रू. किं. १८० मिलीच्या ७४ देशी दारूच्या बाटल्या चा माल जप्त करण्यात आला आहे.

**स्वाक्षरीत**
**पोलीस अधिक्षक**
**औरंगाबाद ग्रामीण करीता**

**श्री सफौ जाधव नियंत्रण कक्ष अधिकारी औरंगाबाद ग्रामीण**